# मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय

Tel. No.022 28860362 E-mail - sgnpmumbai@gmail.com

शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग संकिर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ च्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई, बोरीवली पश्चिम गोराई मुंबई - ९१ यांच्या कार्यालयातील सहाय्यक वसंरक्षक या पदाच्या विवक्षीत कामाकरीता १ पद सहाय्यक वनसंरक्षक या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या सेवानिवृत्त अधिका-या मधून करार पध्दतीने नेमणूक करावयाची आहे. सदरची जाहीरात www.mahaforest.gov.in व https://sgnp.maharashtra.gov.in या वनविभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली आहे. तरी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणा-या इच्छूक सेवानिवृत्त उमेदवाराने अर्ज करावे.

२. अर्हता :-
   - अ) विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
   - ब) करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने समक्ष असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
   - क) करार पध्दतने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

२. कार्यक्षेत्र :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई गोराई यांचे कार्यालय

३. कामाचे स्वरुप :-
   - अ) जमीन / सर्व्हे / वन्यजीव / गुन्हे कक्षाकडील न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
   - ब) योजना / जमीन / वन्यजीव / गुन्हे कक्षाकडील विविध स्वरुपाचे प्रस्ताव हाताळणे.
   - क) वन्यजीव / गुन्हे / जमीन कक्षाकडील विविध स्वरुपाचे मासीक, त्रैमासीक हाताळणे.
   - ड) वरील कामांमधील कर्मचा-यास मार्गदर्शन करावे लागेल.

४. नियुक्तीचा कालावधी :- प्रथम टप्यात देण्यात येणारी नियुक्ती १२ महिन्याकरीता राहील. परंन्तु करार पध्दतीने नियुक्त केलेल्या अधिका-याचे समाधान कारकरित्या पुढील कालावधीकरीता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल.

५. इतर अटी व शर्ती :-
   - अ) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
   - ब) नियुक्तीसाठी समक्ष प्राधिकारी यांना विशेष परीस्थीतीत कोणत्याही वेळेस अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करावयाचे अधिकार राहतील.
   - क) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपवलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसाईक कामात गुंतलेली नसावी.
   - ड) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.
   - इ) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.
   - ई) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी समक्ष असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

६. वेतन :- शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग संकिर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ सोबतच्या परीशिष्ट (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

७. अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे. व त्याचे वय ६५ वर्षाच्या वर नसावे.

८. निवड करण्यात येणा-या अधिका-यास / व्यक्तीस या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टॅम्पपेपर वर बंधपत्र सादर करावे लागेल.

९. अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहीलेला / टंकलेखीत अर्ज (संपूर्ण माहिती असलेला जसे पुर्ण नाव, जन्म तारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव काम केलेल्या विभागाचे नाव इ.) दिनांक २७/१०/२०१७ ते ०६/११/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० पर्यन्त कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा email ID sgnpmumbai@gmail.com वर सादर करावा.

१०. उमेदवाराने दि.०७/११/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखतीकरीता उपस्थित रहावे.

११. सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

मुख्य वनसंरक्षक व संचालक

अर्जाचा नमुना

प्रति,
अध्यक्ष
तथा
मुख्य वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६

विषय :- सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने कामासाठी घेण्याबाबत.
संदर्भ :- वनविभागाच्या वेबसाईटवर / विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डावरील प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

मी आपली संदर्मिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलावर जाहिरात वाचली असुन, माझा वैयक्तीक तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. संपूर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक / ईमेल आय.डी :-

४. शैक्षणिक पात्रता :-

५. अनुभव :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

ठिकाण :-
दिनांक :-